दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● सोमवार दि.७ जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २२१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Monday 7 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 221 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# मुंबईसह राज्यात मुसळधार पावसाची हजेरी अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत

## पुढील चार दिवसांसाठी हवामान विभागाचा 'हाय अलर्ट'

**मुंबई (वृत्तसंस्था)–हवामान विभागाच्या अंदाजानुसार राज्यात आज अनेक भागांमध्ये जोरदार पावसाने हजेरी लावली. मुंबई, ठाणे, पालघर, कल्याण-डोंबिवली, भिवंडी आणि नाशिक या ठिकाणी पावसाने चांगलाच जोर धरला असून, काही ठिकाणी पाणी साचून वाहतुकीवर परिणाम झाल्याचे दिसून आले.दरम्यान, पुढील चार दिवसांसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वादळी वाऱ्यांसह पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. उत्तर कोकण, उत्तर महाराष्ट्र दक्षिण गुजरात व मराठवाड्यासह विदर्भाचा बहुतांश भाग पावसाने व्यापणार आहे. किनारपट्टी प्रदेशात बहुतांश भागात अधून मधून वादळी वाऱ्याची शक्यता आहे.मुंबईत सकाळपासूनच मुसळधार पावसाने जोर पकडला. अंधेरीमध्ये पावसामुळे सबवेमध्ये पाणी साचल्याने ती वाहतुकीसाठी तात्पुरती बंद करण्यात आली. शहरात आता पावसाचा जोर काहीसा कमी झाला असला तरी अनेक सखल भागांमध्ये अजूनही पाणी साचले आहे, ज्यामुळे नागरिकांना आणि वाहनचालकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे.**

### पालघर: वसई-विरार मध्ये पावसाचा कहर

**पालघर जिल्ह्यातील वसई आणि विरार परिसराला जोरदार पावसाने झोडपले आहे. सायंकाळच्या वेळी कार्यालयातून घरी जाणाऱ्या चाकरमान्यांना पाण्यातून वाट काढावी लागली. रस्त्यांवरील खड्डे आणि साचलेल्या पाण्यामुळे वाहनधारकांना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागली. हवामान खात्याने रात्रीही मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे.**

कल्याण आणि डोंबिवलीत सकाळपासूनच अधूनमधून पावसाच्या सरी सुरू आहेत. काही वेळा पाऊस हलका तर काही वेळेस अचानक जोरदार सरी कोसळत आहेत. हवामान विभागानं दिलेल्या अलर्टनुसार, रात्री उशिरा पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे.भिवंडीत दुपारपासून पडणाऱ्या पावसामुळे तीनबत्ती बाजारपेठ पाण्याखाली गेली आहे. अनेक दुकानांमध्ये पाणी शिरल्याने व्यावसायिकांचे मोठे नुकसान झाले आहे. प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे.नाशिकमध्ये गोदावरी नदीच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होत आहे. प्रसिद्ध दुतोंड्या मारुतीच्या मूर्तीच्या छातीपर्यंत पाणी पोहोचले असून, नदीकाठच्या नागरिकांना प्रशासनाने सतर्क राहण्यास सांगितले आहे. गंगापूर धरणातून सध्या ५,१८६ क्युसेस वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू असून, त्यात वाढ करण्यात आली आहे. यामुळे रामकुंडातील पाणीही वाढले असून, पुढील काही तास निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.



### पालघरमध्ये ७ जुलैला शाळांना सुटी जाहीर

**हवामान विभागाने पालघर जिल्ह्याला उद्यासाठी रेड अलर्टचा इशारा दिला आहे. यापार्श्वभूमीवर, ७ जुलै रोजी जिल्ह्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये हा आदेश जारी केला आहे.**

## ओबीसी नेते लक्ष्मण हाकेंना कायदेशीर नोटीस:७ दिवसांत माफी मागा, अन्यथा कारवाईचा इशारा

### अजित पवारांविरोधातील बेताल वक्तव्य भोवले



**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबद्दल नेहमी बेताल वक्तव्य करणाऱ्या व त्यांना शिवराळ भाषेत बोलणाऱ्या लक्ष्मण हाके यांच्या विरोधात कायदेशीर नोटीस बजावण्यात आली आहे. सामाजिक व माहिती अधिकार कार्यकर्ते नितीन संजय यादव यांनी ही नोटीस बजावली असून, हाके यांनी सात दिवसांत अजित पवार यांची लेखी माफी मागावी, अन्यथा न्यायालयात खेचण्याचा इशारा नितीन यादव यांनी दिला आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विरोधात वेळोवेळी जाणुनबुजुन बेताल वक्तव्य करणाऱ्या विरोधात कायदेतज्ज्ञ ड. शंतनु माळशिकारे यांच्या वतीने नितीन संजय यादव यांनी लक्ष्मण हाके यांना आज नोटीस बजावली. लक्ष्मण हाके यांनी अजित पवारांची लेखी माफी न मागितल्यास लक्ष्मण हाके यांना न्यायालयात खेचून दिवाणी, फौजदारी व अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार असल्याचे नितीन यादव यांनी म्हटले आहे.लक्ष्मण हाके यांनी १९ जून २०२५ रोजी पुण्यामध्ये जाहीरपणे आरोप केला होता की, उपमुख्यमंत्री म्हणून अजित पवार यांनी महाज्योती योजनेला दुय्यम वागणूक दिली आहे.त्यानंतर ३ जुलै २०२५ रोजी मुंबईतील गिरगाव चौपाटी येथे महाज्योती योजनेतील निधीच्या कथित कमतरतेवर लक्ष वेधण्यासाठी निदर्शनादरम्यान, हाके यांनी अजित पवार यांच्यासाठी हरामखोर या अपमानास्पद शब्दाचा वापर केला. इतकंच नाही, तर मालेगाव कारखाना निवडणुकीत पवारांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याचाही आरोप करत, ओबीसी समुदाय त्यांच्यापासून दुरावल्याचे म्हटले होते.नितीन संजय यादव यांचा दावा आहे की, ही विधाने अजित पवार यांची प्रतिष्ठा मलिन करण्याच्या उद्देशाने केली गेली असून, ती भारतीय न्याय संहिता, २०२३ (इछड) च्या कलम ३५६(१) अंतर्गत मानहानीच्या कक्षेत येतात. या कलमानुसार, एखाद्या व्यक्तीची प्रतिष्ठा हानी पोहोचवण्याच्या उद्देशाने किंवा हानी पोहोचेल हे माहीत असूनही असे विधान करणे हा मानहानीचा गुन्हा आहे.

## मुख्यमंत्र्यांना अणाजी पंत म्हणणे हा अपमान:देवेंद्र फडणवीसांवर केलेल्या टीकेला केसरकरांचे प्रत्युत्तर

**मुंबई (वृत्तसंस्था)**–हिंदी सक्तीच्या विरोधात आणि मराठी भाषेच्या मुद्द्यावर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आले. मुंबईत पार पडलेल्या विजयी रॅलीमध्ये उद्धव ठाकरे यांनी भाजप आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली. भाषणात त्यांनी फडणवीसांचा उल्लेख 'अणाजी पंत' असा करत टोला लगावला. यावर शिंदे गटाचे आमदार दीपक केसरकर यांनी प्रतिक्रिया देत उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा अशा प्रकारे उल्लेख करणे म्हणजे मुख्यमंत्रिपदाचा अपमान असल्याचे केसरकर यांनी म्हटले. राज्याच्या प्रमुखाला अण्णाजी पंत म्हणणं हे त्या पदाचा अपमान आहे. मुख्यमंत्र्यांची तुलना ही पेशव्यांशीही करता आली असती. राजकारणात वैचारिक मतभेद असावेत. पण ते व्यक्तिगत पातळीवर येऊ नयेत, असे स्पष्ट मत दीपक केसरकर यांनी व्यक्त केले आहे. पुढे ते म्हणाले, दोन भाऊ एकत्र आले ही चांगली गोष्ट आहे. अन्याय झाला म्हणून राज ठाकरे बाहेर पडले. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आल्यावर राज ठाकरे यांच्यावर अन्याय होणार नाही अशी अपेक्षा. वापरा आणि फेकून द्या ही उद्धव ठाकरेंची नीती मी स्वतः अनुभवली आहे. राणेंच्या विरोधात



माझा वापर करून घेतला. यूज अँड थ्रो अशी त्यांची नीती आहे, असे म्हणत उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे.दीपक केसरकर म्हणाले, उद्धव ठाकरे यांना गेल्या दोन निवडणुकांत मिळालेली मते ही फतव्याची मते आहेत. एकनाथ शिंदे यांनी बाळासाहेबांचा विचार कायम ठेवला. राज ठाकरे देखील उद्धव ठाकरे यांच्या सोबत जाऊन तो विचार कायम ठेवतील अशी अपेक्षा आहे. उद्धव ठाकरे त्या विचारापासून दूर गेल्याने त्यांना सगळे आमदार सोडून गेले. बाळासाहेबांची भूमिका ही काँगेस सोबत जाणार नाही अशी होती. उद्धव ठाकरेंनी बाळासाहेबांच्या भूमिकेला छेद दिला. आता उद्धव ठाकरे यांच्यासोबत गेल्यानंतर राज ठाकरेंची भूमिका काय हे लवकरच समजेल.

पुढे बोलताना दीपक केसरकर म्हणाले, मूळ पक्ष आणि पक्षाचे कार्यकर्ते आमच्यासोबत आहेत. त्यामुळेच उद्धव ठाकरे यांना आता राज ठाकरेंची गरज पडली असा टोला दीपक केसरकर यांनी लगावला. तर रस्त्यावरील सत्ता कुणाकडे आहे याचे उत्तर देणार नाही. कायद्याचे पालन सर्वांना करावे लागत. राज्यात भाडंण, मारामाऱ्या होऊ नये एवढीच अपेक्षा आहे.

## धारूर पोलिस ठाण्याचे सपोनि.देविदास वाघमोडे यांचा जुगार अड्ड्यावर छापा

**वडवणी (प्रतिनिधी):** धारूर तालुक्यातील गोपाळपूर येथे जुगार खेळत असल्याची माहिती खाजगी खबरद्वारे कळल्यानंतर पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी मिळालेल्या बातमीची शहानिशा करून धारूर पोलीस स्टेशन मधील पोलीस हवालदार दिनकर पुरी, पोलीस अंमलदार नाना निगुळे, पोलीस अंमलदार संतोष सरवदे, पोलीस अंमलदार देशमुख त्यांचे पथक तयार करून ३ जुलै गुरुवार रोजी गोपाळपूर येथे चालू असलेल्या जुगार अड्ड्यावर छापा मारला असता त्या ठिकाणी तिरट



नावाचा जुगार पैसे लावून खेळत असल्यास समोर आले त्या ठिकाणी नगदी रक्कम २०९००/- रुपये सोबत ९००००/- रु.चा मुद्देमाल असे एकुण ११०९००/- रुपये चा मुद्देमाल सह समाधान लक्ष्मण माळेकर, अशोक बंडू माळेकर, सुरेश दत्तू माळेकर, बाळू रतन आडे, अर्जुन फुलचंद आडे, कैलास बाबुराव चव्हाण, रामराव लक्ष्मन राठोड सर्व रा.गोपाळपूर असे जुगार खेळताना मिळून आले असून त्यांना अटक करण्यात आली आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस अंमलदार नाना निंगुळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून धारूर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस तपास करत आहे.

### जिल्ह्यात पान टपरी पेक्षा अनाधिकृत इंग्लिश स्कूल जास्त

## बीड मध्ये अनाधिकृत शाळांवर कारवाई होणार का?-मनोज जाधव

**बीड (प्रतिनिधी):** राज्यातील अनाधिकृत शाळांबाबतची माहिती सादर करण्याबाबत शिक्षण संचालनालयाने आदेश निर्गमित केले असून आता जिल्ह्यात अनाधिकृत शाळा आढळुन आल्यास सदरिल शाळेवर शासन निर्णय दि.१८ डिसेंबर २०२३ नुसार कार्यवाही करण्याबाबत सूचित केलेले आहे. अनाधिकृत शाळांची माहिती शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांचेकडुन त्यांचे बीट/केंद्र मधील शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांचे जियो टॅग फोटो काढणे आणि विहित प्रपत्रात माहिती भरुन तात्काळ ०७ जुलै पर्यंत सदरिल माहिती व अहवाल सादर करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत. मात्र जिल्ह्यात पान टपरी पेक्षा अनाधिकृत इंग्लिश स्कूल आणि इतर शाळा जास्त आहेत. तेव्हा शिक्षण विभागाला अनाधिकृत शाळा सापडणार का? आणि त्यांच्यावर कारवाई होणार का ? असा सवाल शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केला आहे.

राज्यात मागील काही वर्षांमध्ये राज्य शासनाची कोणतीही मान्यता न घेता अनाधिकृत शाळा मोठ्या प्रमाणात सुरू झाल्या आहेत. या शाळा विद्यार्थ्यांकडून भरमसाट शुल्क वसूल करत असतात. या शाळांवर कारवाई करण्यासाठी शिक्षण संचालनालय यांनी राज्यातील सर्व जिल्ह्यात तपासण्या करण्याचे आदेश दिले आहेत. बीड जिल्ह्यात देखील बऱ्याच अनाधिकृत शाळा असल्याची भीती व्यक्त होत आहे. परंतु जिल्ह्यातील अनाधिकृत शाळांची तपासणी करून त्यावर कारवाई केली जाईल का ? असा प्रश्न विचारला जात आहे. त्यामुळे आता अधिकाऱ्यांनी शाळा तपासणी करण्याचे कागदी घोडे न नाचवता संबंधित शाळांवर कारवाईच करावी. अशीही मागणी मनोज जाधव यांनी केली आहे.



## संपादकीय..

# मुंबईची तुंबई थांबणार कधी ?

मुंबईला पावसाने २६ मेच्या पहाटेपासून अक्षरश: झोडपून काढले. मुंबई शहर आणि उपनगरात दोनशे मिमीपेक्षा जास्त पाऊस पडला. मुंबईचे जनजीवन ठप्प झाले. मध्य, पश्चिम, हार्बर, ट्रान्स हार्बर आणि मेट्रो रेल्वे सेवाही काही काळ बंद पडली. सर्वात कहर म्हणजे बीकेसी ते वरळी आचार्य अत्रे चौक या मार्गावरील भुयारी मेट्रो ३ चे उद्घाटन पंधरा दिवसांपूर्वीच झाले होते. पावसाचे पाणी घुसले आणि मेट्रो स्टेशनला तलावाचे स्वरूप आले. मान्सूनचा पहिल्या सलामीत धो धो पाऊस, लोकल बंद, बेस्ट विस्कळीत, रस्ते, रेल्वे मार्ग पाण्याखाली, सर्वत्र पाणीच पाणी, चिखलाचे साम्राज्य. अगदी जेजे आणि केईएम इस्पितळातही पाणी घुसले. मंत्रालयाच्या प्रवेशद्वारावरच गुडघाभर पाणी. हिंदमातापासून अंधेरी-मिलन सब वे, शीवचे गांधी मार्केट पाण्याखाली. सोमवारी आठवड्याच्या पहिल्या दिवशीच देशाची आर्थिक राजधानी मुंबईची तुंबई झाली. लाखो कर्मचारी, चाकरमानी आपल्या कामावर जाऊ शकले नाहीत.ठिकठिकाणी पाणीच पाणी साचल्याने लाखो मोटारी सोमवारी रस्त्यावर आल्या नाहीत. दोन कोटी लोकसंख्येच्या महामुंबईचे जनजीवन ठप्प झाले. एका दिवसात शेकडो कोटींचे नुकसान झाले. मान्सूनच्या पहिल्या सलामीने देशाची आर्थिक राजधानी ठप्प झाली. मुंबईला सेवा-सुविधा देणाऱ्या डझनभर सरकारी, निमसरकारी यंत्रणा अपयशी ठरल्या. यंदाच्या पावसाळ्यात मुंबई तुंबणार नाही, लोकल सेवा बंद पडणार नाही, असे दावे नेहमी केले जातात, पण एका पावसाने ते फोल ठरवले. नालेसफाई शंभर टक्के न झाल्याचे पावसामुळे उघडकीस आले. मान्सूनचा पाऊस सोळा दिवस अगोदर आला किंवा दोनशे मिमीपेक्षा जास्त पाऊस पडला किंवा गेल्या १०७ वर्षांत मे महिन्यात मुंबईत रेकॉर्डब्रेक पाऊस झाला अशी कारणे देऊन मुंबईचे जनजीवन ठप्प करण्याचे खापर पावसावर फोडले जात आहे. मुंबईकर जनतेने ते कितपत मान्य करावे?

धुवांधार पावसाने मुंबईची तुंबई झाली आणि मुंबई ठप्प झाली हे काही पहिल्यांदाच घडलेले नाही. दरवर्षी पावसाळ्यात मुंबईचे जनजीवन दोन-तीनदा तरी विस्कळीत होते. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतानाही पावसाळ्यात मुंबईची तुंबई झाली होती. मुंबई ही देशाचे अत्यंत महत्त्वाचे महानगर आहे. मग दरवर्षी मुंबईवर पावसाळ्यात जनजीवन विस्कळीत होण्याची आफत यावी? मुंबई महानगराला मुंबई महापालिका नागरी सेवा-सुविधा पुरवते. पंचवीस वर्षांहून अधिक काळ मुंबई महापालिकेवर ठाकरे यांच्या उबाठा सेनेची (पूर्वीच्या शिवसेनेची) सत्ता होती. पंचवीस वर्षे सलग सत्ता असूनही ठाकरे यांच्या पक्षाला मुंबई जलमयमुक्त किंवा अतिक्रमणमुक्त का करता आली नाही? पंचवीस वर्षांच्या कालावधीत मुंबईवर आदळणारे परप्रांतीयांचे लोंढे ठाकरे यांच्या पक्षाला नियंत्रणात का ठेवता आले नाहीत? पंचवीस वर्षांत महापालिकेचा कारभार भ्रष्टाचारमुक्त का करता आला नाही. पंचवीस वर्षांत किती अमराठी ठेकेदारांना महापालिकेची रस्त्याची, पुलांची, खड्डे बुजवायची, उड्डाणपुलांची, स्वच्छता व मलनिस्सारणाची कामे दिली गेली? ठाकरे यांच्या पक्षाच्या कारभाराचा मुंबईची तुंबई होण्याशी किती संबंध आहे हे सुद्धा लोकांना समजले पाहिजे.

जपानला मागे टाकून भारताने जगातील चौथी अर्थव्यवस्था असा सन्मान प्राप्त केला आहे. त्यात मुंबईचे आर्थिक योगदान सर्वात मोठे आहे. केंद्र सरकारच्या दरमहा जमा होणाऱ्या जीएसटीमध्ये सर्वाधिक वाटा हा मुंबईचा आहे. केंद्र सरकारच्या एकूण महसुलात मुंबईचा वाटा सुद्धा सर्वाधिक आहे. कितीही उद्योग व प्रकल्प दुसऱ्या राज्यात स्थलांतरीत झाले तरी मुंबईचे महत्त्व कमी होणार नाही. पण मुंबई ही केवळ सोन्याचे अंडे देणारी कोंबडी आहे किंवा सरकारी खजिना भरणारे समृद्ध शहर आहे, अशी मानसिकता कोणाचीही असता कामा नये. देशातील सर्व राज्यातील व केंद्रीय नेत्यांची घरे मुंबईत आहेत. बॉलिवूड ही तर मुंबईची शान आहे. मोठमोठ्या कंपन्या व बडे उद्योग समूह यांची नोंदणीकृत कार्यालये मुंबईतच आहेत. उत्तुंग पदांवर पोहोचलेले राजकीय नेते, मोठे उद्योगपती, अर्थशास्त्रज्ञ, साहित्यिक, कवी, विकासक, वास्तुशास्त्रज्ञ, शिल्पकार, तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, कलाकार, खेळाडू, संगीतकार, नाटककार, अशी विविध क्षेत्रांतील मान्यवरांची मांदियाळी हे मुंबईचे वैभव आहे. दिल्लीच्या तोडीस तोड प्रवाशांची वाहतूक करणारा आंतरराष्ट्रीय विमानतळ मुंबईत आहे. देशातील सर्व शहरांना जोडणारी विमान व रेल्वेसेवा आणि बंदर अशा सुविधा मुंबईतच आहेत. मुंबईत बँका, विमा कंपन्या, दूतावास, खासगी कंपन्यांची मुख्यालये व वाणिज्य कार्यालये मुंबईतच आहेत. मुंबईचे ऐतिहासिक, भौगोलिक आणि व्यापारी महत्त्व देशातील अन्य कोणत्याही शहरापेक्षा खूपच मोठे आहे. दीड कोटी लोकसंख्येची मुंबई आणि ठाणे, नवी मुंबईसह दोन कोटी लोकसंख्येची महामुंबई अहोरात्र धावत असते. मुंबईसारखे वर्किंग कल्चर देशात कुठेही नाही. मुंबईत खिशात पन्नास - शंभर रुपयांतही सामान्य माणूस पोटभर जेवण करू शकतो आणि श्रीमंतांसाठी त्रितारांकित व पंचतारांकित उंची सेवा देणारी हॉटेल्सही भरपूर आहेत. मुंबईत जशी मीटरवर धावणारी रिक्षा- टॅक्सी अहोरात्र उपलब्ध आहे, तसेस सामान्यांना आरोग्यसेवा देणारी महापालिकेची व सरकारी इस्पितळे उपलब्ध आहेत. तसेच देशातील सर्वोत्तम खासगी इस्पितळे मुंबईतच आहेत.उत्तम शिक्षणसंस्थाही याच महानगरात आहेत. हिंदी प्रदेशात विकास प्रकल्पांच्या नावाखाली हजारो कोटींची गुंतवणूक केली तरी यूपी, बिहार, हरियाणा, ओडिशा, झारखंड, पश्चिम बंगालकडून रोजगाराच्या शोधात येणारे सर्वाधिक लोंढे मुंबईकडे येतच असतात. देशाचा आर्थिक आधारस्तंभ असलेली मुंबई एका मुसळधार पावसाने ठप्प होते, हे दुर्दैव आहे. मुंबईची दरवर्षी होणारी तुंबई कधी थांबणार हाच लाखमोलाचा प्रश्न आहे.मुंबई हे तीन बेटांचे मिळून बनलेले शहर आहे. मुंबईच्या बेटावर किती लोकसंख्या राहू शकते, किती टोलेजंग इमारती उभ्या राहू शकतात, किती लोकसंख्येला पाणीपुरवठा करण्याची क्षमता आहे, लोकल किंवा बस वाहतूक किती प्रवाशांना सेवा देऊ शकते, किती झोपडपट्ट्या या शहराने सांभाळायच्या, यावर राज्यकर्त्यांनी व लोकप्रतिनिधींनी मंथन केले आहे का? विधिमंडळात पूर्वी मुंबईच्या प्रश्नांवर सखोल चर्चा व्हायची. मुंबईत एक कोटींपेक्षा जास्त लोक अमराठी आहेत. परप्रांतातून येणाऱ्या अनोळखी लोकांची पार्श्वभूमी काय आहे, याची माहिती तरी पोलिसांकडे आहे का? मुंबई ही सार्वजनिक धर्मशाळा झाली आहे का? मुंबईत कष्ट करून पोट भरणारी जनता लाखोंच्या संख्येने आहे, मुंबईत येऊन अनेक गडगंज झालेत. मुंबईत येऊन आपण मोठे व्हावे असे स्वप्न बाळगून लोक इथे येत असतात. मग मान्सूनच्या पहिल्या पावसाने लक्षावधी मुंबईकरांना घरी बसावे लागले, ही मालिका कधी थांबणार आहे?मुंबईचा आकार बशीसारखा आहे, जोरदार पाऊस सुरू असताना समुद्राला भरती आली की पाणी वाहून जात नाही व रस्त्यावर पाणी साचते असेही कारण वर्षानुवर्षे सांगितले जाते. मग त्यातून मुंबईची सुटका कधीच होणार नाही का? मुंबईच्या लोकल्समधून रोज ७५ लाखांहून अधिक प्रवास करतात. मुंबईच्या बेस्टमधून आजही तीस लाख प्रवास करतात. १९९०-९५ पर्यंत अनेक आमदार- नगरसेवक हे लोकलने सीएसटी किंवा चर्चगेटला यायचे, स्टेशनबाहेर बेस्टच्या बस थांब्यावर उभे असलेले दिसायचे. भाजपाचे राम नाईक हे केंद्रात मंत्री झाले, राज्यपालही झाले, पण ते आमदार असताना लोकलने चर्चगेटला यायचे. अशी आणखी काही नावे सांगता येतील. राम नाईक, मनोहर जोशी, प्रमोद नवलकर, प्रेमकुमार शर्मा, हशू अडवाणी, राम कापसे, मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर अनेक लोकप्रतिनिधी मुंबईच्या प्रश्नांवर विधिमंडळात पोटतिडकीने बोलत असत. आता तसे चित्र दिसत नाही. महापालिका, मुंबई महानगर विकास प्राधिकरण, मेट्रो रेल्वे, मध्य किंवा पश्चिम रेल्वे, बेस्ट, म्हाडा, सार्वजनिक बांधकाम, एसआरए आदी यंत्रणा मुंबईसाठी राबत आहेत. अतिवृष्टीतही रेल्वे आणि बेस्ट मुंबईकरांना सेवा देते त्याला तोड नाही.लक्षावधी मुंबईकरांचे दैनंदिन जीवन सार्वजनिक सेवेवरच अवलंबून आहे याची जाणीव रेल्वे आणि बेस्टला आहे. लोकांनीही रस्त्यावर कचरा टाकणार नाही, पान, तंबाखू थुंकणार नाही, रुळांवर चूळ थुंकणार नाही, कागदाचे बोळे, प्लास्टिकच्या पिशव्या कुठेही फेकणार नाही असा निर्धार करायला नको का? मुंबई स्वच्छ राहिली तर तुंबई होणार नाही, नालेसफाई चांगली झाली तर रस्त्यावर व रुळावर पाणी साचणार नाही. कचराकुंड्यांची साफसफाई झाली तर गटाराचे पाणी अस्ताव्यस्त पसरणार नाही. भारत देश जागतिक महासत्ता होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनाही मुंबईची तुंबई होणे आवडणार नाही...

# अर्थभरारीचे आनंदरंग




चार लाख कोटी (ट्रिलियन) डॉलरचा टप्पा ओलांडून जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनणे, हे भारताच्या अर्थभरारीचे द्योतक म्हणावे लागेल. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या 'वर्ल्ड इकॉनॉमिक आउटलूक' अहवालानुसार ब्रिटनला मागे टाकल्यानंतर दोन वर्षांतच देशाच्या अर्थव्यवस्थेने जपानलाही मागे टाकून आणखी एक शिखर सर केले आहे. अमेरिका, चीन आणि जर्मनी या देशांपाठोपाठ आता भारत चौथ्या स्थानी असून हीच गती व दिशा कायम ठेवली, तर तीन वर्षांतच भारत जर्मनीलाही मागे टाकण्याचा टप्पा गाठू शकतो, हा 'निती' आयोगाचे मुख्य कार्याधिकारी बी. व्ही. आर. सुब्रह्मण्यम यांचा विश्वास अनाठायी नाही.जगभरातील युद्धजन्य परिस्थितीने निर्माण झालेले क्षेत्रीय तणाव, विस्कळित झालेली पुरवठा साखळी आणि मंदी-महागाईचे सावट अशा स्थितीत भारताची ही कामगिरी अधिक झळाळून निघते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ११ वर्षांच्या काळातील धोरणांना याचे श्रेय आहेच; पण भारताने हे स्थान एका रात्रीत मिळविलेले नाही. नव्वदच्या दशकात भारताने स्वीकारलेल्या मुक्त आर्थिक धोरणांचा आणि उदारीकरणाचा हा परिपाक आहे. पी. व्ही. नरसिंह राव, अटलबिहारी वाजपेयी आणि डॉ. मनमोहनसिंग यांच्या सत्ताकाळात सरकारे बदलली, तरी परराष्ट्र धोरणांप्रमाणेच आर्थिक आघाडीवरही सर्वांनीच राखलेल्या धोरणसातत्याचे हे यश म्हणावे लागेल. त्याच वेळी, अर्थव्यवस्थेत भारत चौथ्या स्थानी असला, तरी दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत खूपच मागे म्हणजे १४३व्या स्थानी आहे हे वास्तव विसरून चालणार नाही.

भारताच्या पुढे असलेला जपान लोकसंख्येतील घट, अस्थिरता-धोरणबदलांमुळे आणि अमेरिकेच्या आयातशुल्क धोरणांमुळे उभ्या ठाकलेल्या आव्हानांचा सामना करीत आहे. त्यामुळे जपानच्या ०.३ टक्क्यांच्या तुलनेत भारताच्या साडेसहा टक्क्यांच्या दरम्यान असलेल्या विकासदराचा यामध्ये मोठा वाटा आहे. गेल्या काही दशकांमध्ये वाढलेली अंतर्गत मागणी, हे भारतीय अर्थव्यवस्थेचे सर्वांत मोठे बलस्थान असून, हीच बाजारपेठ आता साऱ्या जगाला खुणावत आहे. सरकारने केलेल्या गुंतवणुकीचेही सकल उत्पन्नाच्या वाढीत मोठे योगदान आहे.

विशेषत: पायाभूत सुविधांच्या क्षेत्रातील सरकारी गुंतवणूक भविष्याच्या दृष्टीनेही लाभदायक ठरणार आहे. त्यासह तरुणांच्या मोठ्या संख्येतून मिळणारा 'डेमोग्राफिक डिव्हिडंड', धोरणात्मक; विशेषत: करप्रणालीतील सुधारणा, डिजिटायझेशन आणि 'मेक इन इंडिया'सारख्या धोरणांमधून उत्पादनक्षेत्राला प्रोत्साहन हे भारताच्या आर्थिक आघाडीवरील मोठे शिलेदार ठरले आहेत. पहिल्या पाचांत मिळवलेले हे स्थान जागतिक स्तरावर भारताचा प्रभाव वाढविण्यास नक्कीच पूरक ठरणार आहे. त्याबरोबरच या स्थानाचा उपयोग करून आर्थिक व धोरणात्मक नेतृत्व करण्याची वाटचाल आणखी दमदार होऊ शकते. देशाच्या अर्थव्यवस्थेत सर्वांत मोठा (१५ टक्के) वाटा महाराष्ट्राची देशातील आघाडी अधोरेखित करणारा आहे.जर्मनीला गाठण्याचे लक्ष्यही भारत काही वर्षांत साध्य करू शकेल; मात्र चीन (१९.१३ लाख कोटी डॉलर) आणि अमेरिका (३०.५१ लाख कोटी) हा पल्ला दूरवरचा आहे. अंतर्गत मागणीत वाढ व्हायची असेल, तर नागरिकांची क्रयशक्ती वाढविण्यासाठी सर्वसमावेशक विकासाचे लक्ष्य समोर ठेवण्याची गरज आहे. देशातील मोठी संपत्ती काही ठरावीक उद्योजक व अब्जाधीश कुटुंबांकडे आहे, त्यामुळे आर्थिक-सामाजिक विषमता दूर करण्यासाठी पावले उचलण्याची गरज आहे. त्यासाठी विकासाची प्रक्रिया सर्वसमावेशक करणे, रोजगार वाढविणे महत्त्वाचे आहे. बेरोजगारीचे प्रमाण ५.१ टक्के असून, त्यातच शेतीमधील आभासी रोजगारांचेही प्रमाण मोठे असल्याने शेतीची उत्पादकता वाढविण्याबरोबरच शेतीवरील अवलंबित्व कमी करण्याचे दुहेरी आव्हान आहे.लोकसंख्यावाढीला आवर घालतानाच एकूण लोकसंख्येत ५० टक्के वाटा असलेल्या महिलांना उत्पादक कामांकडे वळवून त्यांचे देशांतर्गत उत्पादनातील योगदान वाढविण्यास गती द्यावयास हवी. रोजगारक्षम तरुण पिढी घडविण्याचेही आव्हान मोठे आहे. पायाभूत सुविधांच्या बाबतीत आपण जगाच्या मागे आहोत, हे वास्तव लक्षात घेतले पाहिजे. अंतर्गत मागणीसोबतच निर्यात वाढवून व्यापारतूट भरून काढणे आवश्यक आहे. एकीकडे अमेरिकेसारख्या महासत्तांच्या संरक्षणवादी धोरणांचे आव्हान पेलताना परराष्ट्रनीतीचाही कस लागणार आहे. त्याबरोबरच चलनवाढ-महागाई नियंत्रणात ठेवणे आणि लोकप्रिय धोरणांचा अनुनय थांबवून आर्थिक सुधारणांची गती कायम राखण्याचे आव्हान सर्वांत मोठे आहे.

# व्यवस्था गेली वाहून



यंदा मे महिन्यात जून-जुलै महिन्यात पडावा तसा पाऊस होत असून, या पावसाने उडालेली दाणादाण पाहता सारी व्यवस्थाच वाहून गेल्याची स्थिती आहे. सर्वसाधारण आगमनाच्या १६ दिवस आधी राज्याच्या बहुतेक भागांमध्ये संततधार सुरू झाली आहे. हवामानात टोकाचे बदल होत असल्याचे इशारे शास्त्रज्ञ देत असले, तरी त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या आपल्याकडील नागरी यंत्रणांना यंदा लवकर दाखल झालेल्या पावसाने खडबडून जागे केले आहे. यंदा मे महिन्यात जून-जुलै महिन्यात पडावा तसा पाऊस होत असून, या पावसाने उडालेली दाणादाण पाहता सारी व्यवस्थाच वाहून गेल्याची स्थिती आहे. सर्वसाधारण आगमनाच्या १६ दिवस आधी राज्याच्या बहुतेक भागांमध्ये संततधार सुरू झाली आहे.

केरळमध्ये दाखल झाल्यानंतर आठवडाभराने राज्यात हजेरी लावणाऱ्या मान्सूनचा यंदाचा केरळपासूनचा पुढचा प्रवास प्रचंड वेगाने झाला आणि मुंबई, पुणे यांसह राज्याचा बराचसा भाग त्याने व्यापला. मुसळधार पावसाच्या प्रदेशांसह कमी पावसाच्या जिल्ह्यांमध्येही यंदा अतिवृष्टीसदृश पाऊस झाल्याने पावसाचा 'पॅटर्न' बदलतो आहे काय, हा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. आता काहीशी उघडीप मिळाल्यावर पेरण्या होऊ शकतील; मात्र अचानक आलेल्या पावसामुळे काढणीला आलेल्या पिकांचे आणि फळबागायतीचे मोठे नुकसान झाले आहे.

मोठा पाऊस झाला, की रस्तोरस्ती तुंबलेले पाणी, खड्डे, विस्कळित वीजपुरवठा आणि वाहतुकीची कोंडी हे चित्र आता सार्वत्रिक झाले आहे. त्याला ना महानगरे अपवाद आहेत, ना टुमदार शहरे. यंदाही हेच होत आहे. जागोजागी पाण्याची तळी साचली, तासनतास वाहतुकीच्या कोंडीत नागरिकांना अडकून पडावे लागले. ठिकठिकाणी झाडे कोसळली. राज्यातील बहुतांश यंत्रणांना आपली अव्यवस्था झाकण्यासाठी, यंदा पाऊस नेहमीपेक्षा लवकर आला, अशी सबब मिळाली असली, तरी पाऊस नेहमीच्या वेळी आला असता, तरी या स्थितीत फरक पडला नसता. पावसाच्या पहिल्या तडाख्यातच या यंत्रणांच्या कामांचे पितळ उघडे पडले.

अब्जावधी रुपयांचे नवनवे प्रकल्प राबविण्याच्या आजच्या काळात पावसाळ्यापूर्वी धोकादायक झाडे व त्यांच्या फांद्याची छाटणी, नालेसफाई, रस्त्यांवरील खड्ड्यांची दुरुस्ती अशा दैनंदिन कामांकडे मात्र यंत्रणांचे दुर्लक्ष होताना दिसते. नालेसफाईच्या कोट्यवधी रुपयांच्या निविदा काढल्या जातात, कृत्रिम प्रज्ञा (एआय) तंत्रज्ञानाच्या वापराच्या घोषणा होतात; पण प्रत्यक्षात पहिले पाढे पंचावन्न, अशी स्थिती असते. आपापल्या शहरांमध्ये पाऊस पडल्यावर पाणी साचत असलेली ठिकाणे लहान मुलांनाही तोंडपाठ झाली आहेत; पण अब्जावधींचा अर्थसंकल्प, नवीन तंत्रज्ञान, अनुभवी अधिकारी आणि अभियांत्रिकी विषयातील तज्ज्ञांची फौज असतानाही स्थानिक किंवा राज्यपातळीवरील यंत्रणांना त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करणे का शक्य होत नाही, हे कोडे सामान्यजनांना अद्याप उलगडलेले नाही.

नियोजनाच्या अभावामुळे गेल्या काही दशकांमध्ये राज्यातील शहरे अस्ताव्यस्त वाढली आहेत. या वाढत्या लोकसंख्येला पुरतील, अशा अन्य सुविधांप्रमाणेच पावसाचे पाणी वाहून नेणारी पुरेशी व्यवस्था उभी न राहणे, हे यामागील सर्वांत मोठे कारण. त्यातच गेल्या काही काळात कमी वेळात प्रचंड प्रमाणात पाऊस होतो, असे अनुभवास आले आहे. मग अपुऱ्या वाहिन्यांची क्षमता कमी पडते आणि रस्त्यांवर कमरेपर्यंत पाणी साचते. दुसरी बाब म्हणजे, जागा मिळेल, तेथे काँक्रिट ओतण्याचा लोकप्रतिनिधी-नोकरशाहीचा अट्टहास या शहरांच्या मुळावर येत आहे. हमरस्त्यांसह शहरांमधील गल्लीबोळांतील रस्तेही काँक्रिटचे करण्यामागे काय 'अर्थ' आहे, याची झाडाझडती एकदा वरिष्ठांनी घेतली पाहिजे. त्यामुळे हे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यासाठी जागाच उरलेली नाही. सोबतच अनेक शहरांमध्ये बांधकामांच्या तडाख्यात ठिकठिकाणचे पाण्याचे नैसर्गिक स्रोत बुजले आहेत. ओढे-नालेच नव्हेत; तर या अतिक्रमणांनी तेथील नद्यांचा भागही गिळंकृत केला आहे.

मुंबईत मिठी नदी, पुण्यात राम नदी, तर कोल्हापुरात पंचगंगेसह विविध शहरांमधील नदीकाठ किंवा पात्रांमधील अतिक्रमणांमुळे या नद्यांचे पात्र आक्रसले असून त्यांची वहनक्षमता कमी झाल्याने वारंवार पूरस्थिती उद्भवते आहे. त्याबरोबरच नागरिकांसाठी सुविधा उभारताना भौगोलिक रचनेचा विचार होत नसावा, असे मानण्यास वाव आहे. ठिकठिकाणी उड्डाणपूल, अशास्त्रीय स्पीडब्रेकर किंवा दुभाजक उभारण्याने कृत्रिम उंचसखल भाग निर्माण झाले आहेत. पावसाळ्यात या भागांनाच तलावाचे स्वरूप येते. अशा अडचणींमुळे नागरिकांचे हाल झाल्यावर 'तुमच्या काळात आणि आमच्या काळात,' अशा राजकीय आरोप-प्रत्यारोपांना पूर येतो; पण वाढती लोकसंख्या, बदलते पर्यावरण आणि पाऊसमानाचा विचार करून शहरांचे नियोजन करावे, असे कोणालाही वाटत नाही. त्यामुळे पावसाचे 'लर्ट' देण्यापलीकडे जाऊन सर्वसामान्यांचे जीवन सुसह्य करण्यासाठी कारभारी कधी पावले उचलणार, हा सामान्य नागरिकांना पडलेला प्रश्न आहे.

# खादाड प्राणी



आपल्या शरीराचे वजन साठ किलो असेल आणि आपण बैठे काम करत असू, तर दिवसाला साधारण दोन हजार कॅलरीमूल्याचे अन्न आपण सेवन करतो. त्याचे वजन एक किलो असते. म्हणजेच आपण रोज शरीराच्या वजनाच्या दोन टक्क्यांपेक्षा कमी वजनाचे अन्न खातो. शरीरातील आणि भोवतालच्याही घटकांवर आपले अन्नाचे प्रमाण ठरते.

उदा. आपले वय, शरीराचे वजन, शारीरिक कष्टांचे प्रमाण, आपण पुरुष आहोत की स्त्री, गर्भावस्थेत आहोत का, सध्या बाळाला दूध पाजत आहोत का, आजारी किंवा आजारातून नुकतेच उठलो आहोत का, कोणता ऋतू चालू आहे इत्यादी. काही प्राणी अतिखादाड असतात. वाघ एका बैठकीत साधारण २५ किलो मांस खातो. सिंहाचे वजन दोनशे किलो असते आणि तेही साधारण ३० ते ४० किलो मांस खातात. म्हणजे स्वत:च्या वजनाच्या २० ते २५ टक्के अन्न एका वेळी खातात. हरीण, बैल, रानडुकरे, मगरी असे मोठे प्राणी हे वाघाचे भक्ष्य असते; शिवाय वाघ लहानमोठे पक्षी, बेडूक, उंदीर, घुशी, मासे, साप, सरडे, मुंग्या-वाळवीसारख्या कीटकांचेही सेवन करतो.

कॅनडा, उत्तर-अमेरिकेतील मोठी अस्वले शीतकाल समाधीत बर्फाच्या गुहेत पडून राहतात. त्याआधीचे दिवस ती अधाशासारखी खातात. दिवसाला २५ हजार कॅलरीमूल्याचे अन्न ती फस्त करतात. पाच-सहा महिन्यांच्या समाधीपूर्वी रोज किलोभर वजन वाढेल, इतका आहार ते घेतात. परिणामी, पाचशे किलोच्या अस्वलाचे वजन खादाडीमुळे दुप्पट, म्हणजे एक हजार किलोपर्यंत पोहोचते. यापेक्षाही खादाड असतो तो 'द ब्लॅक स्वॅलोअर' हा सागरी मासा. तीन किलो वजनाचा हा मासा स्वत:च्या वजनाच्या दसपट वजनाचे अन्न एका वेळी खातो.माणूस आपल्या शरीराच्या वजनाच्या मानाने फार जास्त आहार घेत नाही. पण जगभरातील माणसांच्या अन्नात आहे, तेवढी विविधता अन्य कोणत्याही प्राण्यांच्या अन्नात नाही. माणूस वनस्पतींचे, प्राण्यांचे भाग खातो. कच्चे, मोडावलेले, आंबवलेले, कुटलेले, शिजलेले, तळले-भाजलेले, खारवलेले अन्न सेवन करतो. म्हणून माणसाइतका खादाड कोणीच नाही.

# अन्नत्याग आंदोलनाची दखल;बच्चू कडू यांची नऊ मंत्र्यांसोबत मुंबईत बैठक

## मेंढपाळांना चराई क्षेत्र उपलब्ध करून देण्याचे आश्वासन; शासन निर्णयांची प्रतिक्षा

**अमरावती (वृत्तसंस्था)**

माजी मंत्री बच्चू कडू यांनी केलेल्या अन्नत्याग आंदोलनाची दखल घेत गुरुवारी संध्याकाळी मुंबई मंत्रालयात नऊ मंत्र्यांसोबत बच्चू कडू यांची वेगवेगळी साडेचार तास बैठक झाली. यावेळी मेंढपाळांना दिलासा देणारा निर्णय झाला असून मेंढपाळांना त्यांच्या शेळ्या-मेंढ्यांना चारण्यासाठी चराई क्षेत्र उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. या व्यतिरिक्त इतर मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा झाली आहे. मात्र, शासन निर्णय होईपर्यंत आपले समाधान होणार नसल्याचे माजी मंत्री बच्चू कडू यांनी सांगितले.बच्चू कडू यांच्यासोबत बैठकीसाठी संबंधित विभागांचे मंत्री व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अन्नत्याग आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या चर्चेत बच्चू कडू यांनी सविस्तरपणे मेंढपाळ व धनगर समाजाच्या समस्या मांडल्या. यानंतर सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला. दुर्लक्षित असलेल्या समाजघटकांच्या जीवनात परिवर्तन घडवण्यासाठी हे आंदोलन निर्णायक ठरणार असल्याचे चित्र आहे. बच्चू कडू यांनी या बैठकीनंतर बोलताना सांगितले की, आम्ही केवळ आंदोलनासाठी आंदोलन करत नाही, तर जनतेच्या हक्कांसाठी लढत आहोत. शासन सकारात्मक असूनमागण्या मान्य झाल्याचा अधिकृत निर्णय जाहीर होईल. या आंदोलनामुळे ग्रामीण भागातील सामान्य जनतेच्या प्रश्नांना पुन्हा एकदा केंद्रस्थानी आणले गेले असून, आगामी काळात शासनाच्या निर्णयाकडे साऱ्या राज्याचे लक्ष लागले.

या मंत्र्यांसोबत झाली साडे चार तास बैठक महसूल मंत्री चंद्रशेखर बावनखुळे, अतूल सावे (दूध विकास व दिव्यांग मंत्रालय), मानिकराव कोकाटे (कृषी मंत्री), नितेश राणे (मत्स्य व्यवसाय विभाग मंत्री), भरत गोगावले (रोजगार हमी विभाग मंत्री), जयकुमार रावल (पणन मंत्री), बाबासाहेब पाटील (सहकार मंत्री), आकाश पुंडकर (कामगार विभाग मंत्री) आणि गणेश नाईक (वन विभाग मंत्री) यांच्यासोबत बैठक झाली असल्याचे बच्चू कडू यांच्या निकटवर्तीयांच्या वतीने सांगण्यात आले आहे.आता सातबारा कोरा यात्रेला होणार सुरुवात गुरुवारी आमच्यासोबत आठ मंत्र्यांनी सविस्तर चर्चा केली. आमच्या मागण्यांना घेऊन ते सकारात्मक आहेत. मात्र जोपर्यंत मागण्यांची पूर्तता शासन निर्णयातून होणार नाही तोपर्यंत आमचे समाधान होणार नाही. त्यामुळे आमचे आंदोलन सुरूच राहणार आहे. सात जुलैपासून आमचे 'सातबारा कोरा' यात्रेला सुरुवात होणार असून आम्ही राज्याच्या कानाकोपऱ्यात जाणार आहोत,अशी माहिती माजी मंत्री बच्चू कडू यांनी दिली.१७ मागण्यांवर चर्चा शेतकरी, शेतमजूर, मेंढपाळ, मच्छीमार, दिव्यांग, विधवा महिला, ग्रामपंचायत कर्मचारी, बेरोजगार तरुण अशा वंचित आणि उपेक्षित घटकांच्या प्रश्नांसाठी केलेल्या अन्नत्याग आंदोलनाची अखेर शासनस्तरावर दखल घेण्यात आली. बैठकीत १७ महत्त्वाच्या मागण्यांवर सखोल चर्चा झाली.



## जास्त बाम लावल्याने रामदास कदम यांच्या डोक्यावर परिणाम:आदित्य ठाकरे यांची टीका



**मुंबई (वृत्तसंस्था)**–डोक्याला जास्त बाम लावल्यामुळे रामदास कदम यांच्या डोक्यावर परिणाम झाला, अशी तिखट टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी शुक्रवारी सत्ताधारी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांच्यावर टीका केली. त्यांच्या या टीकेमुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेतून तीव्र प्रतिक्रिया येण्याची शक्यता आहे.रामदास कदम यांनी नुकतीच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली होती. उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांचा वेळोवेळी अवमान केल्याचा आरोप त्यांनी केला होता. पत्रकारांनी शुक्रवारी या प्रकरणी आदित्य ठाकरे यांना छेडले असता त्यांनी उपरोक्त शब्दांत टीका केली. जास्त बाम लावल्यामुळे डोक्यावर परिणाम होतो हे त्याचे उदाहरण आहे. त्या व्यक्तीचा निवडणुकीत दोनवेळा पराभव झाला. त्यानंतरही त्यांना विधान परिषदेवर संधी दिली गेली. मंत्रिपद देण्यात आले. पण त्यानंतरही ते पळून गेले. मी त्या व्यक्तीवर बोलू इच्छित नाही, असे ते म्हणाले.

आदित्य ठाकरे यांनी यावेळी पाकिस्तानी हॉकी संघाला भारतात खेळण्याची संधी देण्यावरून केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवरही निशाणा साधला. पहलगाम हल्ल्यातील दहशतवादी अद्याप पकडले गेले नाहीत. त्या हल्ल्याच्या जखमा अद्याप बऱ्या झालेल्या नाहीत. पण त्यानंतरही केंद्राने यंदा भारतात होणाऱ्या हॉकी आशिया कपमध्ये पाकिस्तानला खेळण्यास परवानगी दिली आहे. त्यानंतर बीसीसीआय आपला भारतीय संघ पाकिस्तानविरुद्ध क्रिकेट आशिया कपमध्ये खेळवेल.किती लाजिरवाणी गोष्ट आहे! पाकिस्तानकडून दहशतवादाविरुद्ध निर्णायक कारवाई होईपर्यंत आपण जाहिरातींमधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा मोह रोखू शकतो का? दहशतवाद पूर्णपणे नष्ट होईपर्यंत अशा घटनांमधून पाकिस्तानला फायदा होऊ देणार नाही याबद्दल केंद्र सरकार ठाम राहू शकत नाही का? असा सवाल त्यांनी या प्रकरणी मोदी सरकारला केला आहे.

सरकार पाकसोबत हॉकी व क्रिकेट खेळणार आहे का? हे स्पष्ट करावे. देशाचे परराष्ट्र मंत्री काय करत आहेत? बीसीसीआयने म्हटले आहे की, आम्ही खेळणार नाही तर आयसीसीला ऐकावे लागेल. पण आयसीसीच्या अध्यक्षपदी कोण आहे? जय शहा. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे चिरंजीवच आयसीसीचे अध्यक्ष आहेत, मग आशिया कप स्पर्धेत पाकिस्तानला एंट्री का? असा सवालही आदित्य यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे.

### मीरा–भाईंदरमध्ये ७० टक्के अमराठी लोक

## ते मराठीत बोलतात,मला त्यांच्यामागे ठामपणे उभे रहावे लागेल–सरनाईक

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मीरा-भाईंदर मतदारसंघात ७० टक्के अमराठी लोकं आहेत, त्यांनी दोनदा मला निवडून दिले आहे. त्यांना जर मराठी माणूस लागत नसता तर मला त्यांनी निवडून दिले नसते. मीरा-भाईंदरचे वातावरण खराब करणाऱ्यांना ही चपराक असल्याचे शिवसेनेचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी म्हणत मनसेला टोला लगावला आहे.दरम्यान मीरा रोडच्या शांती पार्क परिसरातील जोधपूर स्वीट्स अँड नमकीन या दुकानाच्या मालकाला मनसे कार्यकर्त्यांकडून मारहाण झाली होती. या घटनेचा व्हिडिओदेखील प्रचंड व्हायरल झाला होता. या घटनेचा तीव्र निषेध करत गुरुवारी संपूर्ण मीरा-भाईंदरमधील व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने दुकाने बंद ठेवत आपला संताप व्यक्त केला. तसेच मारहाण केल्यावरून या व्यापाऱ्यांनी मोर्चादेखील काढून मनसे कार्यकर्त्यांवर कारवाईची मागणी केली आहे. व्यापाऱ्यांनी काल काढलेला मोर्चा हा वाद निर्माण करणाऱ्या लोकांसाठी एक चपराक असल्याचे प्रताप सरनाईक यांनी म्हटले आहे. प्रताप सरनाईक म्हणाले की, माझ्या



मतदारसंघात गेल्या निवडणुकीत मी ८३ हजार तर या निवडणुकीत १ लाख ८ हजार मतांनी निवडून आलो. माझ्या मीरा- भाईंदर मतदारसंघात ७० टक्के अमराठी लोक आहेत. त्यांना जर मराठी माणूस लागत नसता तर त्यांनी मला निवडून दिलने नसते. काम करणारा कार्यकर्ता म्हणून जर ते मला निवडून देत असतील तर मला त्यांच्या पाठीमागे ठामपणे उभे रहायचं कर्तव्य आहे. त्याचबरोबर त्या लोकांनी असे वक्तव्य बिलकुल केले नाही, ठीक आहे एक-दोन लोक असतात नवशिके, त्यांना काहीतरी थोडस मोर्चा किंवा असे काही झाल्यावर स्वत:ला सिद्ध करायचं असते. परंतु हिंदी भाषिक असलेले गुजराती, जैन, मारवाडी, उत्तर भारतीय, बिहारी हे आमच्यासोबत मराठीमध्ये बोलत असतात ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

प्रताप सरनाईक म्हणाले की, मी माझ्या मतदारसंघातील अमराठी लोकांना नेहमी सांगत असतो की आमच्याशी मराठीत संवाद साधा, मराठीत बोलण्याचा किमान प्रयत्न तरी करा, त्यामुळे मीरा- भाईंदरचे वातावरण कलुषित करणाऱ्यांना ही चपराग आहे, असा टोला सरनाईक यांनी लगावला आहे.मनसे नेते अविनाश जाधव म्हणाले, जिथे बंद पाळण्यात आला तो एक लहानसा परिसर आहे. तेथील २५

ते ५० व्यापाऱ्यांनी हा बंद पुकारला होता. आंदोलन हे व्यापाऱ्यांचे नाही तर भाजपच्या लोकांचे होते. भाजपमधील नेते, पदाधिकारी, वकील आणि नरेंद्र मेहतांच्या कुटुंबातील लोक होते. तसेच या परिसरातील अनेक भाजपचे पदाधिकारीही या वेळी उपस्थित असल्याचे दिसून आले.

## कारवाई करा:आदिवासींना दिलेल्या गायींबाबत चौकशी करा, खडसेंकडून चौकशीची मागणी

**मुंबई (वृत्तसंस्था)**–शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या दुधाळ जनावरे, गाय वाटप योजनेची चौकशी करावी. यात अनेक आदिवासी बांधवांना वाटप केलेल्या गायी भाकड आहेत. यातील काही आजारी गायी घरी गेल्यावर मरण पावल्या आहेत. त्या लाभार्थींना विमादेखील मिळालेला नाही. यासंदर्भात तातडीने चौकशी झाली पाहिजे. त्या लाभार्थींकडे जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली पाहिजे, अशी मागणी आमदार एकनाथ खडसे यांनी विधिमंडळाच्या अधिवेशनात विधान परिषदेच्या सभागृहात केली. दिव्य मराठीने २ जुलै रोजी प्रसिद्ध केलेली या विषयाची बातमीच आमदार खडसे यांनी सभागृहात वाचून दाखवली.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळातर्फे स्थलांतर रोखण्यासाठी आदिवासींना गायी वाटप करण्यात आल्या. प्रती गाय ७० हजार रुपयांप्रमाणे लाभार्थींना ८५ टक्के अनुदान देण्यात आले होते. यातील गायी गुजरातहून खरेदी केलेल्या होत्या. १० लिटर दूध देणाऱ्या गायींचा दावा असताना प्रत्यक्षात या गायी कमी दूध देत आहेत. काही भाकड तर काही मरण पावल्याने या योजनेची चौकशी करावी अशी मागणी आमदार खडसे यांनी सभागृहात केली आहे. मंत्र्यांनी प्रत्यक्ष लाभार्थींकडे जाऊन योजनेची माहिती घ्यावी, पाहणी करावी असे आवाहनही त्यांनी केले. या वेळी दिव्य मराठीचे वृत्त त्यांनी वाचून दाखवले.आदिवासी लाभार्थींना देण्यात आलेल्या गायींची वाटपानंतरची स्थिती काय आहे याबाबत



दिव्य मराठीच्या प्रतिनिंधींनी प्रत्यक्ष जागेवर जावून पाहणी केली होती. त्यात काही गायी दगावल्या, काही आजारी तर काही कमी दूध देणाऱ्या असल्याचे वास्तव मांडले होते. यावर शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ नंदुरबारचे शाखा व्यवस्थापक हितेश पाटील यांनी खुलासा करत लाभार्थींनी स्वत: गायींची निवड केली असल्याचे म्हटले आहे.दिव्य मराठीने २ जुलैच्या अंकात 'आदिवासींच्या दावणीला बांधल्या ७८ कोटींच्या आजारी, कमी दूध देणाऱ्या गायी' असे वृत्त प्रसिद्ध केले होते. आदिवासींचे स्थलांतर रोखण्यासाठी ही योजना आणली होती. यात गायी निवडण्याचे स्वतंत्र्य लाभार्थींना होते. त्यांनी स्वत: गायींची निवड केली आणि दूध काढून खात्रीही केली होती असा दावा शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाने केला आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना घानाचा सर्वोच्च नागरिक सम्मान

**मुंबई । वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी पाच देशांच्या दौऱ्यावर गेले आहेत. बुधवारी दोन दिवसांच्या दौऱ्यावर घाना येथे पोहोचले. घानात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे जोरदार स्वागत झाले. घानाचे राष्ट्रपती जॉन ड्रामानी महामा यांनी विमानतळावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वागत केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना गार्ड ऑफ ऑनरसह २१ तोफांची सलामी देण्यात आली. मोदी यांचा हा पहिलाच घाना दौरा आहे. तीन दशकांत पहिल्यांदाच भारतीय पंतप्रधान घानाला भेट देत आहेत. घानामध्ये पंतप्रधान मोदींना 'द ऑफिसर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार ऑफ घाना' या पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले.पंतप्रधान मोदी यांनी हा सन्मान भारतातील नागरिकांना समर्पित केला आणि या सन्मानाबद्दल घानाचे आभार मानले. यावेळी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, घानाचा राष्ट्रीय सन्मान मिळणे ही माझ्यासाठी खूप अभिमानाची आणि सन्मानाची गोष्ट आहे. मी राष्ट्रपती महामा, घाना सरकार आणि घानाच्या जनतेचे मनापासून आभार मानतो. मी १.४ अब्ज भारतीयांच्या वतीने हा सन्मान नम्रपणे स्वीकारतो. मी हा सन्मान आपल्या तरुणांच्या आकांक्षा, त्यांच्या उज्ज्वल भविष्याला आपल्या समृद्ध सांस्कृतिक विविधतेला आणि परंपरांना आणि भारत आणि घाना यांच्यातील ऐतिहासिक संबंधांना समर्पित करतो. भारत सदैव घानातील लोकांसोबत उभा राहणार आहे. एक विश्वासू मित्र आणि विकास भागीदार म्हणून योगदान देत राहणार आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घानाचे राष्ट्रपती जॉन ड्रामानी महामा यांच्याशी बैठक घेतली. चर्चेनंतर भारतीय आणि घानाच्या अधिकाऱ्यांनी दोन्ही देशांमधील चार करारांवर स्वाक्षरी केली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, राष्ट्रपती महामा आणि मी भारत आणि घाना यांच्यातील द्विपक्षीय भागीदारीचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपती महाना यांना भारतात येण्याचे निमंत्रण दिले.

### काँग्रेस फक्त उद्धव ठाकरे,पवार यांच्याशी करणार चर्चा

# राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र आल्यास आघाडी शक्य नाही–पृथ्वीराज चव्हाण यांचा इशारा

**मुंबई । वृत्तसंस्था**

राज्यात सध्या ठाकरे बंधूंमध्ये एकत्र येण्याच्या चर्चांना वेग आला आहे. मराठीच्या मुद्द्यावरून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोघे पुन्हा एकत्र येऊ शकतात, अशी राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. दुसरीकडे शरद पवार आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट देखील एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे.या पार्श्वभूमीवर माजी मुख्यमंत्री व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी काँग्रेसची भूमिका स्पष्ट केली आहे. राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र आल्यास काँग्रेससाठी आघाडी ठेवणं अवघड होईल, असे स्पष्ट मत त्यांनी मांडले आहे.पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, काँग्रेस केवळ उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्याशीच आघाडीबाबत चर्चा करेल. राष्ट्रवादी जर एनडीएसोबत गेली, तर महाराष्ट्रात काँग्रेससाठी त्यांच्यासोबत आघाडी कायम ठेवणे शक्य नाही, हे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, उद्धव आणि राज ठाकरे यांचे एकत्र येणे हा कौटुंबिक मुद्दा आहे. मात्र ते एकत्र आल्यास शिवसेनेच्या पारंपरिक मतांची एकजूट होऊ शकते आणि त्याचा त्यांना राजकीय फायदा होऊ शकतो. राज ठाकरे हे गर्दी खेचणारे नेते आहेत, मात्र त्यांच्या गर्दीचे मतांमध्ये रूपांतर होत नाही. म्हणूनच सध्या विधानसभेत त्यांचे अस्तित्व नाही.राष्ट्रवादीच्या गटविलीनीकरणावर भाष्य करताना चव्हाण म्हणाले की, तोही त्यांच्या कुटुंबातील विषय आहे. पण जर हा गट एनडीएमध्ये सामील झाला, तर काँग्रेसला त्यांच्याशी आघाडी शक्य होणार नाही. त्यामुळे आघाडी तुटण्याची शक्यता नाकारता येत नाही. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांचे विलीनीकरण हा सुद्धा कौटुंबिक मुद्दा आहे. कोणी कोणात विलीन व्हायचे आणि त्या पक्षाचा प्रमुख कोण असेल, हे तेच ठरवतील.पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, शशी थरूर हे परदेशात पाठवण्यात आलेल्या प्रतिनिधीमंडळाचा भाग होते आणि एक सदस्य म्हणून सरकारच्या भूमिकेचे समर्थन करणे, त्यांचे कर्तव्य होते, असे चव्हाण यांनी स्पष्ट केले.



# सौर पंप शक्य नसल्यास पारंपरिक कृषी पंप देणार:भौगोलिक परिस्थितीनुसार निर्णय घेणार; शेतकऱ्यांसाठी लवकरच बैठक

**नागपूर (वृत्तसंस्था)**–राज्य शासनाने सौर ऊर्जेवर आधारित कृषी पंप देण्यावर भर दिला आहे. मात्र भौगोलिक परिस्थितीनुसार सौर पंप देणे शक्य नसल्यास त्या ठिकाणी पारंपरिक कृषी पंप देण्याबाबत शासन विचार करेल. शेतकऱ्यांसाठी कृषी पंपांना वीज जोडणी देण्यासंदर्भात लवकरच बैठक घेऊन याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, अशी माहिती ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी विधानसभेत अर्धा तास चर्चेच्या उत्तरात दिली.विधानसभा सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेतात लावण्यात आलेल्या सीआरआय कंपनीच्या सोलार पंपाच्या तक्रारी बाबत मुद्दा उपस्थित केला होता. या चर्चेत सदस्य शेखर निकम यांनीही सहभाग घेतला.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०३० पर्यंत देशातील ५० टक्के वीज अपारंपरिक स्रोतांतून निर्मित करण्याचे उद्दिष्ट जाहीर केले आहे. त्याला अनुसरून शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध व्हावी, यासाठी राज्यातही सौर ऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन दिले असून मागेल त्याला सौर पंप देण्याची योजना सुरू केली आहे. विशेष म्हणजे सौर पंप घेणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाकडून अनुदान दिले जात असल्याचेही त्यांनी सांगितले.चंद्रपूर जिल्ह्यात सी.आर.आय. कंपनीमार्फत लावण्यात आलेल्या सौर कृषी पंपांबाबत आलेल्या तक्रारींची तातडीने दखल घेऊन कंपनीला १३ लाखाचा दंडही करण्यात आला असल्याचे राज्यमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर यांनी यावेळी सांगितले.या कंपनीच्या सौर कृषी पंपांबाबत १८३ शेतकऱ्यांनी ५४४ तक्रारी नोंदवल्या होत्या. यातील ५४२ तक्रारींचे निवारण करण्यात आले असून, उर्वरित दोन तक्रारी पाण्याचा स्रोत कोरडा झाल्यामुळे निर्माण झालेल्या आहेत. जिथे पाण्याची पातळी खालावली आहे, अशा ठिकाणी बुस्टर पंप बसवून नदी किंवा जलस्रोतांमधून शेतापर्यंत पाणी पोचविण्यात येत आहे, असेही राज्यमंत्री बोर्डीकर यांनी सांगितले.राज्य शासनाने सौर ऊर्जेवर आधारित कृषी पंपांना प्राधान्य दिले आहे. ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी विधानसभेत महत्त्वाची माहिती दिली. भौगोलिक परिस्थितीमुळे सौर पंप देणे शक्य नसल्यास पारंपरिक कृषी पंप देण्याचा विचार शासन करणार आहे. शेतकऱ्यांसाठी कृषी पंपाच्या वीज जोडणी संदर्भात लवकरच बैठक होणार आहे. विधानसभा सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील सीआरआय कंपनीच्या सोलार पंपांबाबत तक्रारींचा मुद्दा उपस्थित केला होता.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०३० पर्यंत देशात ५० टक्के वीज अपारंपरिक स्रोतांतून निर्मित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. राज्यात 'मागेल त्याला सौर पंप' ही योजना सुरू आहे. शेतकऱ्यांना या योजनेंतर्गत शासनाकडून अनुदानही मिळते. चंद्रपूर जिल्ह्यात सी.आर.आय. कंपनीच्या सौर कृषी पंपांबाबत १८३ शेतकऱ्यांच्या ५४४ तक्रारी होत्या. कंपनीवर १३ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. ५४४ पैकी ५४२ तक्रारींचे निराकरण झाले आहे. उर्वरित दोन तक्रारी पाण्याचा स्रोत कोरडा पडल्यामुळे आहेत. पाण्याची पातळी खालावलेल्या ठिकाणी बुस्टर पंप बसवून नदी किंवा जलस्रोतांमधून शेतापर्यंत पाणी पोहोचवले जात आहे.



## एकाचे भाषण अपूर्ण तर दुसऱ्याचे अप्रासंगिक
# ठाकरे बंधूंच्या विजयी मेळाव्यावर आशिष शेलारांची टीका; हे केवळ राजकारण

**मुंबई (वृत्तसंस्था)**–भाजप नेते व मंत्री आशिष शेलार यांनी मनसे प्रमुख राज ठाकरे व शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या विजयी सभेवर टीका केली आहे. तसेच हे केवळ महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने केलेला कार्यक्रम असल्याची टीका देखील त्यांनी केली आहे.आशिष शेलार म्हणाले, मराठी भाषा यावर प्रतिक्रिया द्यायची असेल तर कालचा कार्यक्रम आणि त्यात झालेली भाषणे याला बघून मी एकच म्हणेल एकाचे भाषण अपूर्ण, दुसऱ्याचे भाषण अप्रासंगिक आणि संपूर्ण कार्यक्रम अवास्तव. ज्यावेळी मी अपूर्ण असे म्हणतो त्यावेळी जरूर एकाने मराठी विषयावरच राहण्याचा प्रयत्न केला, ही चांगली गोष्ट आहे. पण, मांडणी करताना मांडलेले मुद्दे विपर्यासाचे होते. या प्रत्येक मुद्द्याला मी खोडू शकतो, असे म्हणत आशिष शेलार यांनी राज ठाकरे यांच्या भाषणावर टीका केली आहे.पुढे बोलताना आशिष शेलार म्हणाल, त्रिभाषा सूत्र कधी आले, यांच्या गावातही ती माहिती नाही, कोणी आणली ती माहिती दिली ती भाषणात चुकीची. देशात अन्य कुठे त्रिभाषा आहे, हे साधे गूगल केले तरी सापडले असते. असे धादांत खोटे म्हणून अपूर्ण. मी प्रत्येक गोष्ट मांडू शकतो. दुसऱ्याचे भाषण अप्रासंगिक, विषय मराठीचा ते सोडून ट ला ट, फ ला फ आणि घ ला घ या पद्धतीचे टोमणेबाज भाषणाची परंपरा आणि केवळ उद्धवजींच्या भाषणात तर सत्ता गेल्याचा जो ससेहोलपटपणा होता तो दिसत होता, उद्विग्नता होती,



तडफड होती. या पलीकडे काहीच नाही. हा कार्यक्रमच अप्रासंगिक होता, असे आशिष शेलार म्हणाले. याचे कारण ना भाषेचा विषय, ना विद्यार्थ्यांच्या भविष्याची चिंता. आणि म्हणून म महापालिकेचाच, म यांच्या महत्त्वाकांक्षेचा, राजनैतिक महत्त्वाकांक्षेचा विषय. याला राजनैतिक उत्तर आम्ही देऊ. ज्यांच्याकडे बोलायचे मुद्दे नसतात ते गुद्द्यावर येतात. ज्यांना आपली बाजू मांडण्यात कमतरता वाटते ते सामाजिक आणि जातीय वितुष्टीकरणाची भूमिका मांडतात. अणाजीपंत म्हणजे काय ? तुम्हाला नाव ठेवले तर राग येईल न. मग ठेवायची का नाव आम्ही? त्या दोघांबद्दल नाव ठेवायला आहेत.आशिष शेलार म्हणाले, एकत्र येण्याचे श्रेय जर ते देवेंद्र फडणवीस यांना देत असतील तर माननीय बाळासाहेब ठाकरेंचे आशीर्वाद त्यांनाच मिळतील. दोघांच्याही भाषणात तकलादूपणा होता आणि अप्रामाणिकपणा होता. याचे कारण ते दोघेही प्रामाणिक असते तर त्यांना देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करावेच लागले असते. पहिल्या जीआर मधली हिंदी अनिवार्य अट देवेंद्र फडणवीस यांनी काढली. समजूतदारपणा हा मोठा भाऊच घेत असतो, त्यानुसार देवेंद्र फडणवीस यांनी दूसरा जीअर मागे घेतला. मग का दोघे भाऊ देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करत नाहीत? या दोघांचे हेतु केवळ राजकीय आहे. भाषेच्या विषयाशी त्यांना देणे-घेणे नाही.आम्ही नाही तिसऱ्या भाषेला विरोध केला. विषय काय आहे त्रिभाषा सूत्राला विरोध काय आणि मुद्दा काय तुमची मुले कुठे शिकली. तुमची लेकरे ज्या शाळेत शिकली त्या बॉम्बे स्कॉटिश इंग्लिशच्या ऐवजी मुंबई स्कॉटिश इंग्लिश असे करा असे का नाही म्हणालात? असा सवाल शेलार यांनी उपस्थित केला. बॉम्बेचे मुंबई करा असे का म्हटले गेले नाही? आपल्या लेकरांनी चांगले ते घ्यायचे आणि महाराष्ट्रातील बाकीच्या लेकरांना जाऊ द्या, काहीही शिकू द्या, असे आहे.

## ऊस उत्पादनात एआय तंत्रज्ञानाचा वापर
# शेतकऱ्यांना गोदाम,कोल्ड स्टोरेजची सुविधा देण्याची गरज-नितीन गडकरी

**नागपूर (वृत्तसंस्था)**–जगातील सर्वोत्तम अद्ययावत ज्ञान आणि आपल्या जवळच्या माणसांनी केलेले यशस्वी प्रयोग समजून घेत शेतकऱ्यांना पुढे जावे लागणार आहे. शेतीतील उत्पादन खर्च कमी करणे आणि उत्पादन वाढवण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता व अत्याधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर ऊस, सोयाबीन, कापूस, संत्रा आदी पिकांचे उत्पादन वाढविण्यासाठी फायद्याचा ठरू शकतो, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.

ॲग्रोव्हिजन फाउंडेशनतर्फे ऊस शेतीसाठी एआय तंत्रज्ञान या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. एनबीबीएस सभागृह, (राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण व भूमी उपयोग संस्थान) अमरावती रोड येथे झालेल्या या कार्यशाळेला बारामती कृषी विज्ञान केंद्रातील संशोधक डॉ. विवेक भोईटे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.शेतकऱ्याचे उत्पादन थेट बाजारात जाणे. त्याच्या मालाला चांगला भाव मिळणे खूप आवश्यक आहे. त्यादृष्टीने काम सुरू आहे. शेतकऱ्यांना गोडाऊन, कोल्ड स्टोरेज उपलब्ध करून देण्याची गरज आहे, असे विदर्भात विशेषतः सोयाबीन, कापूस, संत्रा, ऊस या पिकांवर फोकस




ठेवावा लागेल. योग्य तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि संशोधन मिळाले तर विदर्भातील शेतकरी नक्कीच प्रगती करू शकेल. त्यासाठी नवे तंत्रज्ञान आणि संशोधन शेतकऱ्यांना समजून घ्यावे लागेल. एकमेकांच्या समन्वयातूनच हे शक्य आहे. त्यासाठी नॉलेज ट्रान्सफॉर्मेशन चेन निर्माण करावी लागेल,' असेही गडकरी म्हणाले. यावेळी गडकरी यांनी बांबू लागवडीचे महत्त्व देखील सांगितले. सूत्रसंचालन नितीन कुलकर्णी यांनी केले.

गडकरी यांनी सभागृहात शेतकऱ्यांच्या मध्ये बसूनच एआयच्या वापराच्या संदर्भातील प्रेझेंटेशन बघितले. तज्ज्ञांनी केलेले मार्गदर्शन ऐकले. त्यानंतर त्यांनी बराचवेळ खाली बसूनच शेतकऱ्यांसोबत संवाद साधला. सत्कार स्वीकारण्यासाठी व्यासपीठावर गेले असता काही मुद्द्यांवर विचार मांडले.

## जगात सुखी होण्यासाठी नामाशिवाय पर्याय नाही
## गुरूपौर्णिमा महोत्सवात इंदोरीकर यांचे कीर्तन

**अक्कलकोट (वृत्तसंस्था)**–या जगाला सुखी व्हायचं असेलतर, हरी नामा शिवाय पर्याय नांही, मीपणा व अहंकार अंगिकारल्यामुळे माणसाच्या जीवनाचा अंत होतो. या दोन गोष्टी पासून माणूस लांब राहिल्यास आनंद व समाधान मिळते असे परखड विचार प्रसिध्द कीर्तनकार निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांनी व्यक्त केले.



श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३८ वा वर्धापनदिनानिमित्त आयोजित गुरूपौर्णिमा महोत्सवातील सहावे पुष्प इंदोरीकर महाराज यांच्या कीर्तनाने गुंफण्यात आले. प्रारंभी इंदोरीकर महाराज व न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले व उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना इंदोरीकर महाराज म्हणाले, आई-वडील, संत भगवंत या शिवाय माणसाचे जीवन शून्य असून, सध्याच्या विविध घडामोडीवर वृत्ती, वल्ली व कृती या बाबतचे कलियुगातील दाखले देत सडेतोड व परखड विचार व्यक्त करत भक्ती, शक्ती, धर्म-संस्कार प्रबोधन या त्रिवेणी संगमात भक्तजनांना आनंदाचे डोही आनंद तरंग अशी अनभुती दिली. गर्दीमुळे ठिकठिकाणी स्क्रीनद्वारे प्रक्षेपण करण्यात आले होते.

# साने गुरुजी निवासी विद्यालय एक आदर्शवत शाळा-लक्ष्मणराव बेडसकर

**केज( प्रतिनिधी: )**विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक साहित्य वाटप करणारी साने गुरुजी निवासी विद्यालय जिल्ह्यातील एकमेव शाळा असुन बीड जिल्ह्यात साने गुरुजी निवासीविद्यालय केजने शैक्षणिक क्षेत्रात एक आदर्श निर्माण केला आहे असे गौरवोद्गार गट शिक्षण अधिकारी श्री.लक्ष्मण राव बेडस्कर यांनी काढले.ते नवीन शैक्षणिक वर्षाच्या पूर्व संध्येला विद्यार्थ्यांना वह्या,पुस्तके ,शालेय दप्तरचे वाटपकरण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून केज तालुका गट शिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर हे होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या प्राचार्य तथा मुख्याध्यापिका डॉ.कविता गित्ते -कराड मडम,हरिभाऊ पाटोळे, उत्तम मोती,बाबासाहेब चाटे यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला यावेळी शाळेतील प्रवेशित सर्व निवासी विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तकं,दप्तर ,इत्यादी शैक्षणिक साहित्याचे वाटप केज तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्या हस्ते करण्यात आले.या शैक्षणिक साहित्यांचे वाटप कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना बेडसकर म्हणाले की, विद्यार्थ्यांना दिलेले शैक्षणिक साहित्य अतिशय दर्जेदार व चांगल्या प्रतीचे आहेत. एवढ्या मोठ्याप्रमाणात साडेसातशे मुलांचे निवासी वसतिगृह चालवणे व त्यांना दर्जेदार सुविधा देणे हे सोपे काम नाही.खरंच सदर शाळा व वसतिगृह हे अतिशय वंचित घटकातील विद्यार्थ्यां साठी चालते याचा केज तालुक्याला अभिमान आहे.फक्त वस्तीगृह व शाळा चालवायची म्हणून सदर शाळा चालत नसून एक मॉडेल स्कूल सध्या बीड जिल्ह्यात साने गुरुजी आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.त्याबद्दल संस्था आणि शाळा प्रशासनाचे कौतुकही केले तसेच मुलांना या नवीन शैक्षणिकवर्षाच्या शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती सुवर्णा सिरसाट यांनी केले तर आभार शाळेचे ज्येष्ठ शिक्षक हरिभाऊ पाटोळे यांनी आभार मानले आणि विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.संपूर्ण कार्यक्रम अतिशय शिस्तबद्ध व आनंददायी वातावरणात पार पडला.

# युवा कर्तबगार नेते प्रवीण माने यांनी भाजप मध्ये प्रवेश केल्याने इंदापूर तालुक्याचे राजकीय समीकरण बदलणार

**इंदापूर । प्रतिनिधी**

देशाचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांना दैवत मानणारे तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आपले नेते मानणारे जिल्हा परिषदेचे माजी आरोग्य व बांधकाम सभापती प्रविण माने यांनी अखेर गुगली टाकत भाजप मध्ये प्रवेश केला आहे. मुंबई भाजप कार्यालयात राज्याचे कॅबिनेट मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते तसेच भाजपचे नूतन प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रविण माने यांना भाजप चे कमळ चिन्ह असलेले उपरणे घालून त्यांचे भाजप मध्ये जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती मयुरसिंह पाटील यांच्यासहित अनेक मान्यवर पदाधिकारी, सरपंच, कार्यकर्त्यांनी भाजप मध्ये प्रवेश केला. यावेळी खासदार धनंजय महाडिक, आमदार राहुल कुल, बाबासाहेब चवरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी अनिकेत निंबाळकर, बबनराव लावंड, चांगदेव ढुके, यशवंत कचरे, अमोल मुळे, आप्पासाहेब गायकवाड, तुकाराम गोलांडे, नाना धापटे, रमेश पाटील, भारत बोंगाणे, विकास आढाव, समदभाई सय्यद आदींनी भाजप मध्ये प्रवेश केल्याचे घोषित करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी कोण आला रे कोण आला, इंदापूरचा वाघ आला अशी जोरदार घोषणाबाजी करत सभागृह दणाणून सोडत शक्ती प्रदर्शन केले.

यावेळी मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, प्रविण माने यांच्या भाजप प्रवेशाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. त्यांचा प्रवेश झाल्याने त्यांना सर्वतोपरी सहकार्य केले जाईल अशी ग्वाही त्यांनी दिली.यावेळी प्रविण माने म्हणाले, जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण परिवर्तन आघाडीच्या माध्यमातून अपक्ष उमेदवार म्हणून पहिल्यांदाच आमदारकी लढविली. त्यामध्ये मला लक्षवेधी ३९ हजार मते मिळाली. जिल्हा परिषदेचे बांधकाम सभापती म्हणून काम करताना ३०० कोटी रुपयांचा निधी आणून विकासकामे केली. राज्य लेखा समितीचे माजी अध्यक्ष, सोनाई दूध संघाचे संस्थापक अध्यक्ष दशरथदादा माने यांच्या नेतृत्वाखाली कोणताही



मोठा नेता नसताना जनतेच्या प्रश्नासाठी ही निवडणूक लढवून लक्षवेधी मते घेतली. देशातील सोनाई दूध संघाच्या माध्यमातून प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे हजारो लोकांना रोजगार मिळाला. या उद्योगा बरोबरच इतर पुरक व्यवसायाची निर्मिती केली. त्यामुळे तालुक्याच्या विकासात दूध संघाने मोठे योगदान दिले आहे. इंदापूर तालुका हा नीरा भीमा नद्यांच्या खोऱ्यात वसला असून भिगवण येथे रेल्वे स्थानक आहे. तालुक्याची भौगोलिक परिस्थिती चांगली असून देखील विकासाचा अनुशेष मोठा आहे. त्यामुळे सर्व कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय पक्षात प्रवेश करावा असा आग्रह धरला. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी तर राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मोठे काम असून ते देश व राज्य सर्वसामान्य माणूस, शेतकरी व कामगार केंद्रबिंदू मानून काम करत आहे. आता जगातील सर्वात मोठ्या पक्षात प्रवेश झाल्याने इंदापूर तालुक्यातील जनतेसाठी चोवीस तास उपलब्ध असल्याची ग्वाही श्री माने यांनी देताच टाळ्यांच्या कडकडाटात व शिट्या वाजवून त्याचे उपस्थित कार्यकर्त्यांनी उस्फुर्त स्वागत केले.आता राज्यात महायुतीची सत्ता असून इंदापूर चे आमदार दत्तात्रय भरणे हे राज्य मंत्रिमंडळात क्रीडा, युवक कल्याण व अल्पसंख्याक विकास खात्याचे मंत्री आहेत. त्यामुळे आगामी नगरपरिषद, पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुकीत प्रविण माने यांचा कस लागणार आहे. आगामी विधानसभा निवडणूक महायुतीतील सर्व पक्षांनी स्वतंत्र लढण्याचे ठरविल्यास त्यांना प्रविण माने यांच्या रूपाने प्रचंड जनसंपर्क असलेला कर्तबगार नेता मिळाला आहे. माने यांनी भाजप मध्ये प्रवेश केल्यानंतर राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाचे अध्यक्ष तथा माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या राजकीय भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान भाजपचे ज्येष्ठ नेते अतुल तेरखेडकर, माऊली चवरे, शहराध्यक्ष किरण गानबोटे यांनी माने यांचे जोरदार स्वागत केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077